# कर्मवीर कन्या समाज शिक्षिका सौ.कल्पनादेवी पाटील

*क्रांतीवीर रंगराव दादा पाटील यांच्या पत्नी सौ. कल्पनादेवी यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. सौ.कल्पनादेवी यांच्या कार्याचा हा परिचय.*

सौ.कल्पनादेवी पाटील यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण करून शिक्षिका म्हणून निवृत्त झाल्यानंतरही त्यांच्यातील शिक्षिका समाजाला प्रेरक ठरली. १५.७.१९२७ रोजी बागणी (ता.वाळवा)येथील सापान्य मराठा कुटुंबात त्यांचा जन्म झाला. प्राथमिक शिक्षण बागणी गावातच पूर्ण केले. शिक्षिका व्हायचे ठरविले असले तरी त्यांच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती बेताची असल्यामुळे त्यांना ट्रेनिंग पूर्ण करता येत नव्हते. त्यांनी आपली इच्छा कर्मवीर अण्णांना बोलून दाखविली. कर्मवीरांनी त्यांच्या ट्रेनिंगसाठी त्यांना दत्तक घेतले. त्यांचे शिक्षण पूर्ण झाले. कर्मवीरांनी शिक्षित कन्येचा संसार मांडून देण्यासाठी पित्याची भूमिका पार पाडली. आणि १२ मार्च १९४७ रोजी सातारा येथे क्रांतीवीर रंगरावदादा पाटील यांच्याशी त्यांचा शुभविवाह गांधी पध्दतीने पार पडला. १९४७ ते १९४९ या काळात कर्मवीर आण्णांच्या वसतिगृहात राहून ट्रेनिंग कॉलेजचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर १९.८.१९४९ रोजी शिगाव येथे प्राथमिक शिक्षिका म्हणून नोकरीला सुरूवात केली. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत श्री रंगरावदादा पाटील यांच्या बरोबर संयुक्त महाराष्ट्र, दारूबंदी, महागाई, दूध, गोवामुक्ती इत्यादी आंदोलनात त्यांनी काम केले. सावित्रीबाई फुले यांचा वारसा जिवंत ठेवण्याचे कार्य सौ.कल्पनादेवी पाटील यांनी सतत केले. घोषापध्दती विरूध्द व मुलींना शिकवायचे नाही या पध्दतीविरूध्द त्यांनी संघर्ष करून शिक्षिकेचे कार्य अखंडितपणे ३७ वर्षे केले. सांगली जिल्हा परिषदेने त्यांच्या शिक्षिकेच्या चांगल्या कार्याबद्दल आदर्श शिक्षिका म्हणून १९७६-७७ साली जिल्हा पुरस्कार देऊन त्यांचा यथोचित गौरव केला. शिक्षिकेचे काम करताना घराकडे दुर्लक्ष केले नाही. मुलांमुलींना चांगले शिक्षण व सुसंस्कार देऊन जगण्याची क्षमता निर्माण केली. त्यामुळे आदर्श माता म्हणून त्यांचे कार्य नाकारता येणार नाही. क्रांतीवीर रंगरावदादा पाटील यांच्या प्रत्येक कार्यात सहभागी होत असल्यामुळे क्रांतीवीराची पत्नी म्हणून त्यांचे जीवन उज्ज्वल झाले.



सौ.कल्पनादेवी पाटील

एक शिक्षिका म्हणून व्रतस्थपणे कामे केल्यामुळे त्या आदर्श शिक्षिका झाल्या. समाजाचे ऋण फेडण्याची त्यांची तळमळ विचारात घेता त्या समाजाच्या शिल्पकार झाल्या.

ताराराणी विद्यापीठ उभारण्यातील त्यांचा मोलाचा वाटा त्यांचे सुपुत्र प्राचार्य डॉ.क्रांतीकुमार पाटील आणि त्यांच्या दोन सुकन्यांनी पुढे चालविला आहे.

भाई रंगरावदादा महाराष्ट्रभर शेतकरी कामगार पक्षाच्या प्रचारासाठी गुंतलेले असल्यामुळे मुलामुलींच्या संगोपनाचा भार आणि प्रपंचाचा गाडा सौ.कल्पनादेवी पाटील यांनी अत्यंत कुशलपणे ओढला आणि यशस्वी गृहीणी झाल्या.

शेतकरी कामगार पक्षाचे दारूबंदी आंदोलन वारणा खोऱ्यात चालू असताना गावोगावी दारू अड्ड्यावर धाडी घालून अड्डे बंद पाडले. त्यांना दहशत बसविण्यासाठी दंड आकारणी केली जात होती. त्या दंडाच्या पैशातून सौ.कल्पनादेवी पाटील यांच्या प्राथमिक शाळेच्या समस्या सोडविण्यात यश आले. सौ.पाटील यांनी एक नामांकित प्राथमिक शाळा तयार केली. त्याचे फळ त्यांना आदर्श शिक्षिकेच्या पुरस्कारातून मिळाले. १९७२ सालच्या दुष्काळामध्ये इस्लामपूरच्या मोर्चामध्ये त्यांचे चिरंजीव हुतात्मा झाले. चि.राजेंद्रच्या वियोगाचा धक्का त्यांनी पचविला आणि मनाचा तोल ढळू दिला नाही. मनाचा खंबीरपणा आणि फुले कर्मवीरांचा वारसा घेऊन कार्यरत राहिलेल्या सौ.कल्पनादेवी आज आपल्यामध्ये नाहीत. त्यांच्या विचारातून बहुजन समाजाचे शिक्षण घडविले जाणे ही त्यांना खरी श्रध्दांजली ठरेल.'

-डॉ.डी.के.पाटील

दै.पुढारी 18 जाने २००२